## Listening Passage

### सूर्य उगवला नाही तर

सूर्य उगवला नाही तर पहिल्यांदा तुम्हाला खूप आनंद होईल. कारण रात्र संपली हे तुम्हाला कळणारच नाही. पण नंतर मात्र कंटाळा येईल. सारखे दिवे लावल्यामुळे विजेचा तुटवडा होईल. सगळीकडे अंधार होईल. झाडे सुकतील, गवत वाळेल. जनावरे उपाशी राहतील. ऊन नाही मग समुद्राच्या पाण्याची वाफ कशी होणार? ढग कसे बनणार आणि पाऊस कसा पडणार? पाऊस नसेल तर पिके येणार नाहीत. आपल्याला अन्न मिळणार नाही. नद्या सुकतील. पिण्याचे पाणी मिळणार नाही. मग आपल्याला कळेल की सूर्य आहे म्हणून आपण जगतो.

प्रश्न

१) सूर्य उगवला नाही तर पहिल्यांदा कसे वाटेल?

२) सूर्य उगवला नाही तर उजेड कसा करता येईल?

३) सूर्य उगवला नाही तर झाडांवर काय परिणाम होईल?

४)पाऊस का पडणार नाही?

५)पाऊस पडला नाही तर काय होईल?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Listening Passage

**सर्कस**

मनूने काल दिल्लीला सर्कस पाहिली. पहिला खेळ ट्रॅपीझच्या झोपाळयांचा होता. त्यात चकचकीत कपडे घातलेल्या तीन मुली आणि तीन मुलगे  होते. ते दोरीच्या शिडीवरून चढले. सर्वांनी उंच झोके घेतले. एका झोक्यावरून दुसऱ्या झोक्यावर उड्या मारल्या.

शेवटी विदूषक आला. तो शिडीवर चढताना दोन वेळा पडला. मग त्याने झोके घेतले. झोका घेताना तो खाली लावलेल्या जाळयात धपकन पडला. झटकन उभाही राहिला. सगळे लोक हसले .मनूला खूप मजा वाटली. तिने जोरात टाळया वाजवल्या.

प्रश्न

१) मनू कुठे गेली होती व तिने तिथे काय केले ?

२) पहिला खेळ कसला होता?

३) ट्रॅपीझच्या खेळात एकूण किती मुलेमुली होती?

४) विदूषक ट्रॅपीझच्या झोक्यावर कसा चढला?

५) तुम्हाला सर्कशीतला कोणता खेळ पाहायला आवडेल ? का?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Reading Passage

### पिस्ते

पिस्ता हा सुका मेवा सर्वांना आवडतो. पण त्याची फळे तुम्ही पाहिली आहेत का? झाडावरची पिस्त्याची फळे द्राक्षाच्या घडासारखी दिसतात.

पिस्त्याचे लालसर हिरवे फळ उघडले की आत टणक सालासकट पिस्ता सापडतो. हे टणक आवरण काढल्यावर हिरवट रंगाचा पिस्ता मिळतो,जो आपण खातो. कोवळा पिस्ता नारळातल्या मलईसारखा लागतो. खारे पिस्ते देखील खूप चविष्ट लागतात. शिवाय पिस्त्याची बर्फी, मिठाई, कुल्फी व आईस्क्रीम बनवतात.

इराण हा देश पिस्त्यांकरता प्रसिद्ध आहे. आजकाल पिस्त्याचे सर्वात जास्त पीक कॅलिफोर्नियामध्ये होते.

प्रश्न

१) झाडावरची पिस्त्याची फळे कशी दिसतात?

२) आपण खातो तो पिस्ता कशाच्या आत असतो?

३) कोवळा पिस्ता कसा लागतो?

४) पिस्त्यापासून बनवलेला कोणता पदार्थ तुम्हाला आवडतो? का ?

५)पिस्त्यांकरता कोणता देश प्रसिद्ध आहे?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.

## Reading Passage

### जादूगार

गेल्या महिन्यात आमच्या शाळेत एक जादूगार आला होता. सर्व मुले जादूचे प्रयोग बघायला उत्सुक होती. जादूगार एकदम रुबाबदार दिसत होता. त्याच्या हातात टोपली होती. टोपली रिकामी होती. त्याने टोपली उलटी केल्यावर त्यातून एक लाल फूल बाहेर आले. फुलावर त्याने टोपली ठेवली आणि उचलली तर फुलाचा एक मोठा हार झाला. त्याने हार गळयात घातला. मग त्याने एक उडी मारली तर हार नाहीसा झाला. मला खूपच मजा वाटली.

तेव्हापासून शाळेतल्या मुलांना जादूचे वेड लागले आहे. मुले मधल्या सुट्टीत, एखादी काठी घेऊन जादूच्या कांडीसारखी फिरवतात आणि वस्तू नाहीशा करायचा प्रयत्न करतात. नाणी,पत्ते किंवा रुमाल वापरून एकमेकांना जादू दाखवताना त्यांना खूप मजा येते.

प्रश्न

१) गेल्या महिन्यात मुलांनी शाळेत काय पाहिले?

२) फुलावर टोपली ठेवून उचलल्यावर कोणती जादू झाली?

३) मुले मधल्या सुट्टीत काठी का फिरवत होती ?

४) एकमेकांना जादू दाखवताना मुलांना कसे वाटते?

५) उताऱ्यातील जादूच्या प्रकारांपैकी तुमचा आवडता जादूचा प्रकार कोणता?

Produced by BMM Shala Exam Committee
© Copyright. Material used by BMM Marathi Shala only.
All rights reserved by Bruhan Maharashtra Mandal of North America.